ग्रामीण भागातील सायंकाळी प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र

Reg.No.MHMAR/26/A2477

email-bhikachavan781@gmail.com

दैनिक

# सायं मंथन

संपादक-चव्हाण भिका हरचंद 9503726229

वर्ष : १ ले | अंक : ३४ वा | सोमवार १७ ऑगस्ट २०२६ | पाने :४ | किंमत : २ रूपये

# सराफा दुकानातील चोरीचा पर्दाफाश;

## चार जणांना अटक बुरखाधारी महिलांकडून चोरीचे ४०.१२० ग्रॅम सोने, कार व मोबाईलसह ९ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त



शिरपूर/प्रतिनिधीः- शहरातील महात्मा गांधी कॉम्प्लेक्स मधील सराफा दुकानातून सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या तीन बुरखाधारी महिला व त्यांच्या वाहनचालकास शिरपूर शहर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने सावळदे गावाजवळ सापळा रचून अटक केली. आरोपींकडून चोरीच्या सोन्याची लगड, चोरीसाठी वापरलेली कार व दोन मोबाईल असा एकूण ९ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.महात्मा गांधी कॉम्प्लेक्समधील नंदुरबारकर सराफ दुकानातून ५ ऑगस्ट रोजी दुपारी दोन ते रात्री आठच्या दरम्यान तीन बुरखाधारी महिलांनी सुमारे ६ लाख रुपये किमतीचे ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील आठ जोड दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी दुकानाचे मालक सुरेंद्र सन्मुखलाल सराफ यांच्या फिर्यादीवरून शिरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलिस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात संशयित महिला स्विफ्ट डिझायर कारमधून जात असल्याचे आढळले. वाहन क्रमांकाच्या आधारे फास्टॅगची माहिती घेऊन तसेच गोपनीय बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी आरोपींचा माग काढला. संशयित महिला मालेगावहून इंदूरकडे जात असल्याची माहिती मिळताच सावळदे गावाजवळ सापळा रचून चौघांना पकडण्यात आले.अटक करण्यात आलेल्यांमध्ये अन्नु ऊर्फ साजिदा बशीर खान (३६, रा. कमालपुरा, मालेगाव), मन्नु ऊर्फ मुनसजा शेख गमीर (२३), रीजवाना जाकीर शेख (३५, दोन्ही रा. विजय नगर, मालेगाव) तसेच वाहनचालक नदिम शेख गयासोद्दिन शेख (४२, रा. अयुब नगर, मालेगाव) यांचा समावेश आहे. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.चोरीचे दागिने मुंब्रा येथील सराफ दुकानदाराला विकल्याचे आरोपींनी सांगितल्यानंतर पोलिसांनी तेथे जाऊन संबंधित सराफाची चौकशी केली. त्याने आरोपींकडून दागिने खरेदी करून त्यांची लगड बनविल्याचे सांगितले. पोलिसांनी ४०.१२० ग्रॅम वजनाची सुमारे ६ लाख रुपये किमतीची सोन्याची लगड जप्त केली.यासोबतच ३ लाख रुपये किमतीची एमएच-०५-एएक्स-७६८५ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कार आणि १० हजार रुपये किमतीचे दोन अँड्रॉइड मोबाईल जप्त करण्यात आले. अन्नु ऊर्फ साजिदा खान हिच्याविरुद्ध कुर्ला व नागपाडा पोलिस ठाण्यात चार गुन्हे, तर मन्नु ऊर्फ मुनसजा शेख हिच्याविरुद्ध कुर्ला पोलिस ठाण्यात एक गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.या कारवाईत शिरपूर शहर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केलेल्या तपासामुळे सराफा दुकानातील चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. सदरची कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे,शिरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांचे मार्गदर्शना खाली शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी गुन्हे शोध पथकाचे पोहेकॉ रविंद्र आखडमल, अतुल पाटील,पोकॉ योगेश दाभाडे,गोविंद कोळी, विनोद आखडमल,भटु साळुंके, सचिन वाघ, प्रशांत पवार,आरीफ तडवी,सोमा ठाकरे, मनोज दाभाडे,मनोज महाजन तसेच मपोकॉ वर्षा चौधरी, मोहिनी कोकरे,चित्रा पावरा व होमगार्ड मिथुन पवार आदींनी केली आहे.

# शिरपूरमध्ये कानबाई मातेला भावपूर्ण निरोप

## उत्साहात विसर्जन मिरवणूक





शिरपूर/प्रतिनिधी :- खान्देशचे ग्रामदैवत असलेल्या कानबाई मातेच्या दीड दिवसांच्या उत्सवाची सोमवारी शहरासह तालुक्यात भक्तिमय वातावरणात सांगता झाली. सकाळपासूनच कानबाई मातेच्या विसर्जन मिरवणुकांना सुरुवात झाली. पारंपरिक वाद्यांचा गजर, ढोल-ताशांचा निनाद आणि डीजेच्या तालावर नाचत भाविकांनी मातेचा जयघोष करत नदीपात्राकडे मार्गक्रमण केले.श्रावण महिन्याच्या पहिल्या रविवारी कानबाई मातेची स्थापना करण्यात आली होती. दीड दिवसांच्या पाहुणचारानंतर सोमवारी मातेच्या विसर्जनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. घराघरांत रोट पूजन करून भाऊबंदकीचा स्नेह अधिक दृढ करण्याची खान्देशची पारंपरिक प्रथा यानिमित्ताने उत्साहात पार पडली.शहरातील विविध भागांतून निघालेल्या विसर्जन मिरवणुकांमध्ये महिला, पुरुष, युवक-युवती तसेच बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या भाविकांमुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली. 'कानबाई मातेचा जयजयकार' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.दरम्यान, विसर्जन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शिरपूर शहर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली. पोलीस निरीक्षक किशोर कुमार परदेशी यांनी स्वतः रस्त्यावर उतरून विविध विसर्जन मार्गांची पाहणी करत परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी केलेल्या नियोजनामुळे विसर्जन मिरवणुका सुरळीत पार पडल्या.नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य केल्याने शहरासह तालुक्यातील कानबाई माता विसर्जन सोहळा शांततेत, उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# धुळे कारागृहाच्या सुधारणांसाठी सर्वतोपरी सहकार्य : पालकमंत्री रावल

## प्रशासकीय इमारत व प्रवेशद्वाराचे उद्घाटन; १४ कोटी ९१ लाखांचा निधी मंजूर



धुळे/प्रतिनिधी :- ऐतिहासिक वारसा लाभलेल्या धुळे जिल्हा कारागृहाच्या सुधारणांसाठी राज्य शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. कारागृहातील बंदिवानांनी कौशल्य आत्मसात करून स्वावलंबी व्हावे, यासाठी मानवतावादी दृष्टिकोनातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.धुळे जिल्हा कारागृहातील मुख्य प्रशासकीय इमारत व प्रवेशद्वाराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुप अग्रवाल, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी (पान २वर)